इरेरावठ ढोणे



**विशेष सहाय्याच्या योजनांमध्ये तृतीय प्रकृतीस अर्थसहाय्य देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : संगायो-२००४/प्र.क्र. २४३/विसयो

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : १२ ऑगस्ट,२००४

वाचा : शासन निर्णय क्रमांक : साअयो-२००३/प्र.क्र.१५९/विसयो,दिनांक १४ जानेवारी,२००४

शासन निर्णय : दिनांक १४ जानेवारी,२००४ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक अर्थसहाय्य योजनांच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत व एकत्रित आदेश देण्यात आलेले आहेत. या आदेशान्वये कोणत्या व्यक्ती पात्रतेच्या अटीनुसार आर्थिक मदत मिळण्यास पात्र समजण्यात येतील याचा ऊहापोह केलेला आहे. व्यक्ती ही संज्ञा नैसर्गिक व्यक्तीसाठी वापरतांना त्यामध्ये स्त्री व पुरुष असा प्रामुख्याने भेद केला जातो. तथापी मनुष्य प्राण्यांमध्ये स्त्री/पुरुषांबरोबरच तृतीय प्रकृती ( eunuch ) हा घटक आपोआप मोडत असल्यामुळे दिनांक १४ जानेवारी,२००४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेमधील पात्रतेच्या अटीमधील व्यक्ती या संज्ञेमध्ये तृतीय प्रकृतीचा ( eunuch ) समावेश करण्यात येत असून त्यांना सदर शासन निर्णयामधील अटी, नियम व तरतुदीनुसार अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर शासन निर्णय तात्काळ अंमलात आणण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

पाठविले

दि. 26 OCT 2004

बारनिशी लिपिक

12/8/04

( डॉ. मुन्शीलाल गौतम )

शासनाचे प्रधान सचिव.

२८८/०४ संगायो

प्रति,